जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
Address – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in Ph.020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.२१/११/२०२४

## दि.२०/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७७६/२०२४, भा.न्या.स.कलम १०९,३५१(३) |
| **फिर्यादी** | एक अल्पवयीन बालक,वय १५ वर्षे,घुले नगर मांजरी रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक विधी संघर्षित बालक वय १४ वर्षे,रा.मुंढवा पुणे (ताब्यात) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/११/२०२४ रोजी दुपारी १४/३० वा.चे सुमारास सुभद्रा नर्सरी भोसले पब्लीक स्कुल मांजरी झेड कॉर्नर येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व नमुद बालक यांचे मध्ये अँन्यूअल फंक्शनचे संबंधाने झालेल्या शाब्दिक वादाचा राग मनात धरून विधीसंघर्षग्रस्त बालक याने काचेच्या तुकड्याने फिर्यादी हा वर्गामध्ये बसलेला असताना पाठीमागुन येऊन फिर्यादीचे गळ्यावर वार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी यास जिवे मारण्याची धमकी दिली. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.उमेश रोकडे,मो.नं.७०२१६३६७४९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १७७७/२०२४, भा.न्या.स.कलम १०६(१),२८१ सह मो.वा.का.कलम १८४, १११/१७७,१३४ |
| **फिर्यादी** | राकेश वाघ वय ३४ वर्षे,रा.हडपसर पुणे |
| **आरोपीत** | महादेव मोहन कवटेकर वय ३४ वर्षे, रा.गुंजूंटी,ता.उंबरगा,जि.धाराशिव उस्मानाबाद (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२४ रोजी रात्री २०/१५ वा.चे सुमा.ग्लायडिंग सेंटर समोर,बस स्टॉप जवळ, सासवड पुणे रोड,हडपसर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील कंटेनर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी जुपीटर मोपेडस्वार अनिल नामदेव खळदकर वय ४२ वर्ष रा.मु.कुंभारवळण पो.खळद ता.पुरंदर जि.पुणे यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | म.सहा.पो.निरी.हसीना शिकलगार मो.नं.८७७९४२३४६३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४९६/२०२४, भा.न्या.स.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २१ वर्ष रा.वाकडेवाडी.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १९/११/२०२४ रोजी रात्रौ २२/४५वा ते २३/०० वा.दरम्यान,स्वारगेट एस.स्टी. स्टॅण्ड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व साक्षीदार इसम हे वर नमुद केले ता.वेळी स्वारगेट एस.टी.स्टॅण्ड येथुन स्वारगेट ते सांगली या बसमध्ये चढत असताना कोणीतरी अज्ञात चोरट्याने आमचे संमती शिवाय,अप्रामाणिकपणे,लबाडीचे इराद्याने फिर्यादी व साक्षीदार यांच्या एकुण ६०,०००/-रुपये किंमतीच्या दोन चेन.चोरून नेल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक पाटील मो.नं.७२५०६२६२०५ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | स्वारगेट पो स्टे ४९७/२०२४, भा.न्या.स.कलम ३०३(२) |
| **फिर्यादी** | एक इसम वय २६ वर्षे,रा.उंड्री,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २०/११/२०२४ रोजी अंदाजे १४/४५ वा.चे सुमारास स्वारगेट एस.स्टॅण्ड येथे मुंबई ते पुणे शिवनेरी बसमध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे मुंबई ते पुणे या शिवनेरी बसमधुन प्रवास करत असतांना त्यांनी त्यांची सॅक ही रॅक वर ठेवली होती बस जेव्हा शेवटचे बसस्टॉपला थांबली तेव्हा ते खाली उतरताना त्यांना २,९५,०००/- रुपये किंमतीचा लॅपटॉप,आयपॅड व इतर महत्वाचे कागदपत्र असलेली सॅक मिळुन आली नाही.ती कोणीतरी अज्ञात इसमांने फिर्यादी यांचे सहमती शिवाय, लबाडीच्या इरादयाने व स्वतःच्या आर्थिक फायदया करीता चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.अशोक पाटील मो.नं.७२५०६२६२०५ |

**भाग-१ ते ५ चे गुन्हे दि.२१/११/२०२४ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दुपारी १२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मुंढवा पो.स्टे.४४३/२०२४,भा.न्या.स.कलम १०९,११८(२),११८(१),११५(२),३२४(४),३(५) भारतीय हत्यार कायदा कलम ४,२५,महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१),१३५ |
| **फिर्यादी** | एक इसम,वय २८ वर्षे,रा.बी.टी.कवडे रोड,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर दोन ते तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक २१/११/२०२४ रोजी रात्रौ ०१/३० वा.ते रात्रौ ०२/०० वा.चे दरम्यान स्वराज अमृततुल्य,सर्व्हे नंबर ४५,देवकी पॅलेस चौक,बी.टी.कवडे रोड,घोरपडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्याचे तीन मित्र असे वर नमुद केले ठिकाणी गप्पा मारत असतांना यातील नमुद इसम तेथे येवुन त्यांचे मध्ये शाब्दीक वाद व बाचा-बाची झाल्याने जुने वादाचा राग मनात ठेवुन यातील नमुद इसम व त्याचे ०२ ते ०३ साथीदार यांनी धारदार हत्याराने फिर्यादी यांचा मित्र अमित परदेशी याचे डोक्यात व हनुवटीवर वार करुन गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादीस हाताने व उलट्या कोयत्याने मारहाण केली.सोहेश याचे देखील डाव्या कानाचे जवळ धारदार हात्याराने वार करुन जखमी केले. तसेच अजय पवार याचे डोक्यात, मानेवर,पाठीमध्ये,पोटावर,दोन्ही पायावर धारदार हत्याराने वार करुन गंभीर जखमी करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला व स्विफ्ट गाडी हीचे मागील काच फोडून नुकसान केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी.संदीप जोरे,मो.नं.९४०३५४७५०१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**